# भारतीय प्रशासनातील ई – शासन

**सारिका धनपाल माळगे** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**डॉ. शार्दुल माणिकराव सेलूकर.** सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे

---

**सारांश**

आजचे युग हे माहिती व संचार क्रांतीचे युग म्हणून ओळखले जाते. त्यामुळे कार्याची पारंपारिक पद्धती जाऊन त्या ऐवजी आज सर्वत्र आधुनिक माहिती तंत्रज्ञान साधनांचा वापर केला जात आहे. पारंपारिक व्यवस्थेत पारदर्शकतेचा अभाव, भ्रष्टाचारात प्रोत्साहन, माहिती जनतेस वेळेवर न मिळणे असे अनेक दोष होते. यावर प्रभावी उपाय म्हणजे ई - शासन होय. आज भारतीय प्रशासनामध्ये संगणक, इंटरनेट, व्हिडिओ कॉन्फरन्स, टेलिफोन, मोबाइल अशा अनेक साधनांचा वापर करून नागरिक व प्रशासनात सुसंवाद निर्माण झाला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासनाशी संबंधित सर्व क्रियांची पुनर्रचना, संगणक इंटरनेटच्या माध्यमातून तत्पर व गुणात्मक निर्णय घेणे, उपलब्ध संसाधनांचा प्रभावी उपयोग करणे, कार्यात पारदर्शकता, भ्रष्टाचार निर्मूलन व प्रशासकीय मूल्यांची जोपासणा करणे शक्य होते.

आज भारतीय प्रशासनात ई – शासनाचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे पेपरलेस व्यवहाराला जास्त महत्त्व निर्माण झाले आहे. सदर संशोधन पेपर मध्ये भारतीय प्रशासनातील ई – शासन याचा सविस्तरपणे आढावा घेतला आहे.

**प्रस्तावना**

ई – गव्हर्नन्स म्हणजे शासनाकडून माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानाच्या माध्यमाद्वारे नागरिकांना चांगल्या सेवा – सुविधा उपलब्ध करून देणे होय. ई – गव्हर्नन्स हा शब्द गुड गव्हर्नन्स या अर्थाने घेतला जातो. सुशासन म्हणजे लोकप्रशासन लोकाभिमुख, कल्याणकारी करण्यासाठी माहिती आणि संपर्काच्या तंत्रज्ञानाचा वापर करणे होय. राज्य प्रशासनात पारदर्शकता, सुलभता, कार्यक्षमता निर्माण करण्यासाठी ई – शासनाची प्रक्रिया उपयुक्त ठरत आहे. प्रशासनात आढळणारे भ्रष्टाचार, लाचलुचपत, दप्तर- दिरंगाई, अकार्यक्षमता, बेजबाबदारपणा, सत्तेचा गैरवापर असे दोष दूर करण्यासाठी ई – शासनाची आवश्यकता असते. भारतीय प्रशासनातील विविध खाती, शासकीय महामंडळ, बिगर शासकीय संघटना(एन. जी. ओ.), स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी उद्योग धंदे कंपन्या अशा सर्व क्षेत्रात ई – शासन पद्धतीचा स्वीकार करण्यात येऊ लागला आहे. राज्यात शांतता सुव्यवस्था, कायद्याचे राज्य, आणि कल्याणकारी राज्य प्रस्थापित करण्यासाठी ई – शासन पद्धती अत्यावश्यक मानली जात आहे.

ई – शासनामुळे शासकीय प्रक्रियेतील ताठरता दूर होऊन शासन पारदर्शी, कार्यक्षमपणे जनतेसाठी कार्य करते. शासन कोणत्या दिशेने कार्य करीत आहे, याची माहिती जनतेला मिळते. जनता जागरूकपणे शासनाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होते. ई – शासनामुळे सार्वजनिक हिताची प्राप्ती सहजपणे होऊ शकते. यामुळे आधुनिक शासन हे ई – शासन बनण्याचा प्रयत्न करताना दिसते. परिणामी विकसित, विकसनशील, व अविकसित राष्ट्रे देखील ई – शासन स्वीकारत आहेत. जे शासन इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा (ICT) वापर जास्तीत जास्त करते ते शासन अधिक कार्यक्षम व जबाबदार असलेले दिसते.

थोडक्यात ई – शासन ही आधुनिक काळाची एक गरज बनली आहे. या दृष्टीने ई – शासनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

Key Words -E-Governance सुसंचन

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. प्रशासनातील ई – शासन संकल्पना समजून घेणे.
2. ई - शासनाच्या स्वरूपांचा अभ्यास करणे.
3. प्रशासनात ई – शासनाच्या उपयुक्ततेचा आढावा घेणे.
4. भारतीय प्रशासनातील काही निवडक विभागातील ई – शासनाचा अभ्यास करणे.

**गृहितके**

1. प्रशासनातील ई – शासन संकल्पना समजून घेतली आहे.
2. ई – शासनाच्या स्वरूपांचा अभ्यास परिपूर्ण झाला आहे.
3. भारतीय प्रशासनात ई – शासनाच्या उपयुक्तता दिवसेंदिवस वाढताना दिसते.
4. शासनाच्या विविध विभागात ई – शासन प्रगतीपथावर आहे.

**संशोधन अभ्यास पद्धती**

संशोधन पेपर लिहिण्यासाठी विविध पुस्तकांचा, लेखांचा, मासिके, वर्तमानपत्रे इंटरनेट ई. साधनांचा वापर केलेला आहे.

**आशयाची मांडणी**

ई – गव्हर्नन्स म्हणजे " इलेक्ट्रॉनिक गव्हर्नन्स. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने राज्यप्रशासन चालवणे होय. ई – गव्हर्नन्स म्हणजे शासकीय कामकाजात सुधारणा करण्यासंबंधी अशी प्रक्रिया की ज्यामध्ये तंत्र, विज्ञानाचा वापर केला जातो. विज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्यांचा वापर करून राज्याच्या विकास योजनांची अंमलबजावणी करणे होय. ई – शासन या संकल्पनेचा वापर माहिती आणि संपर्क या अर्थाने घेतला जातो. उदा. इंटरनेट, नेटवर्क, मोबाईल सेवा इ. माहिती आणि संपर्काच्या तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांना

सेवा सुविधा पुरविणे होय. ई – गव्हर्नन्सच्या प्रक्रियेत माहिती आणि संपर्काच्या तंत्रज्ञानाचा वापर (ICT) करताना नागरिक, उद्योगधंदे, आणि शासकीय संस्था यांच्याशी संबंध येत असतो. लोकांच्या हिताच्या विकासाच्या दृष्टीने शासकीय योजना राबवताना नागरिक आणि शासन तसेच शासन आणि उद्योगधंदे, सेवा यांच्यामध्ये जी आंतर क्रिया घडवून येते, जे परस्पर संबंध निर्माण होतात त्यामध्ये माहिती आणि संपर्काचा तंत्रज्ञानाचा साधनाचा वापर केला जातो. त्यामुळे ते कार्य अधिक सुलभपणे, कार्यक्षमतेने यशस्वी केले जाते. ई – शासनाचा वापर करून शासकीय योजनांची व कार्यक्रमांची माहिती लोकापर्यंत अत्यंत जलद गतीने पोहोचविली जाते. त्याचप्रमाणे आदर्श अद्ययावत शासकीय यंत्रणा निर्माण करून सार्वजनिक सेवा, सुविधा लोकांना जलद गतीने पोहोचविणे शक्य होते. उदा. ई – एज्युकेशन,ई – मेडिसिन, ई – रजिस्ट्रेशन, ई – ट्रान्सफोर्ट, ई – पोलीस, ई – कोर्ट. शासकीय कार्यालयामध्ये संगणकीकरण, इंटरनेट, नेटवर्क, मोबाईल सेवा यांच्या वापरामुळे वेळ आणि खर्चात काटकसर होऊ लागली आहे. इलेक्ट्रॉनिक साधनांच्या वापरामुळे दप्तर -दिरंगाई, बेजबाबदारपणा, काळाबाजार, भ्रष्टाचार, घोटाळे, लाचलुचपत, इ. दोष कमी होऊ लागले आहेत. उदा. सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण केल्यामुळे तत्पूर्वी होणाऱ्या धान्यांचा काळाबाजार, बोगस शिधापत्रिका शोधून काढण्यात यश आले आहे. माहिती आणि संपर्क साधण्यासाठी वैज्ञानिक आणि तांत्रिक साधनांचा वापर केल्यामुळे राज्य प्रशासनात अचूकता, जबाबदारपणा, प्रामाणिकपणा, कार्यक्षमता अशा गुणांची वाढ होऊन प्रशासन लोकाभिमुख, ग्राहकाभिमुख, आणि पारदर्शक झालेले आहे.

**ई – शासनाची व्याख्या पुढीलप्रमाणे**

1. जागतिक बँकेच्या मतानुसार ई – शासन म्हणजे माहिती तंत्रज्ञानाचा शासनाच्या यंत्रणांकडून होणारा वापर होय. या वापरामुळे नागरिक, व्यवसायिक व शासनाची इतर अंगे व शासन यांच्यातील संबंध पारदर्शी होण्याची क्षमता निर्माण होते.

2. युनेस्कोच्या मते "ई – शासन म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमे वापरून शासनाने केलेली कामगिरी होय."

3.ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या मते " पारदर्शी, स्मार्ट, ई – शासन म्हणजे सहजपणे उपलब्ध असणे, सुरक्षित तसेच आंतर विभागीय अडथळा दूर करून अचूक माहितीचा प्रवाह सुरू असणे आणि नागरिकांना योग्य व निष्पक्ष सेवा मिळणे होय ".

**ई – शासनाच्या अवस्था**

ई – शासनाच्या एकूण चार अवस्था आहेत. या चार अवस्थांचा विकास संगणकीय तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर होत असलेला दिसून येतो. भारतामध्ये 1990 नंतर जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे इलेक्ट्रॉनिक संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढत गेला.

भारतीय प्रशासनातील ई – शासनाच्या विकासाचा अभ्यास करीत असताना पुढील चार अवस्था प्रकर्षाने दिसून येतात.

**1. संगणकीकरण** 1990 नंतरच्या जागतिकीकरणाचा सर्वात जास्त सकारात्मक परिणाम म्हणजे संगणकीकरण होय. ही ई – शासनाची पहिली अवस्था होय. या अवस्थेमध्ये कार्यालयामधील प्रत्येक कर्मचाऱ्याला संगणक उपलब्ध करून दिला जातो. सुरुवातीला संगणकाचा वापर शब्दावर प्रक्रिया करण्या इतपत मर्यादित होता. त्यानंतर मात्र त्याचा विकास होऊन संगणकाचा वापर माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी मोठ्या प्रमाणात होऊ लागला.

**2. नेटवर्किंग** ही ई – शासनाची दुसरी अवस्था आहे. यामध्ये शासनाचे काही विभाग, काही सहकारी संस्था यांच्यामध्ये माहितीचे आदान – प्रदान करण्यासाठी एक केंद्र स्थापन करून त्यांच्याशी या सर्वांना जोडले जाते. त्यामुळे शासनाच्या विविध संस्थांमध्ये माहितीचा प्रवाह सुरू होतो.

**3. ऑनलाइन उपस्थिती** इंटरनेटची उपलब्धता वाढल्यामुळे वेबवर उपस्थित राहण्याची गरज वाढत चालली आहे. साहजिकच गरज म्हणून वेबसाईटची संख्या वाढत चालली त्यामुळे ई – शासनाचे एक महत्त्वाचे अंग म्हणून शासनाला देखील वेबसाईटची निर्मिती व देखभाल करावी लागत आहे. अशा प्रकारे शासनाच्या प्रत्येक विभाग व संस्थांना ऑनलाइन उपस्थिती अत्यावश्यक बनली आहे. तसेच शासनाच्या प्रत्येक विभागाला स्वतःच्या वेबसाईटवर विभागाची रचना, संपर्क, अहवाल, उद्दिष्टे, प्रकाशन, भविष्यातील योजना या सर्व गोष्टींची माहिती अद्यावत द्यावी लागते.

**4. ऑनलाइन परस्परता** ऑनलाइन उपस्थितीमुळे सहाजिकच शासनाच्या विविध विभागांना परस्परांमध्ये तसेच विभाग व नागरिक यांच्यामधील संवादाचे माध्यम खुले होते. शासनाचा प्रत्येक विभाग, आपल्या विभागांच्या वेबसाईटवर अर्ज, कायदे, सूचना, नियम यासारखी सर्व माहिती उपलब्ध करून दिल्याने प्रशासनातील व्यक्तिगत हस्तक्षेप कमी होतो.

अलीकडच्या काळात प्रशासन व नागरिक यांच्यामधील सर्व व्यवहार हे मोठ्या प्रमाणावर ई – शासनावरच होत असल्याने नागरिकांना माहिती व सेवा जलद गतीने मिळत आहेत.

**ई – शासनाचे स्वरूप**

1. शासन ते शासन

शासन संस्थेची विविध खाती नेटवर्कच्या माध्यमातून परस्परांना जोडली जातात. शासकीय कार्यालयाच्या अशा नेटवर्कच्या परस्पर संबंधामुळे प्रशासनाविषयी त्वरित हालचाली, कृती करता येतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात खर्चात काटकसर होताना दिसते. शासकीय धोरणांची निर्मिती आणि कार्यवाही करताना विविध खात्याकडून आवश्यक ती माहिती मागवावी लागते.

नेटवर्क वरून माहिती मिळत असल्याने वेळ व पैसा याची बचत होते. सचिवालय, वेबसाईट, इंटरनेट, नेटवर्क, मोबाईल इ. माध्यमाद्वारे ई - शासनाची प्रक्रिया चालू असलेली दिसते.

2. शासनसंस्था ते नागरिक

याचा मुख्य हेतू शासन संस्था व नागरिक यांच्यातील संबंध मैत्रीपूर्ण बनवणे हा आहे. सार्वजनिक सेवा सुविधांचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांना घेण्यात यावा यासाठी ई - शासनाची निर्मिती केली जाते. यामध्ये सार्वजनिक सेवांची माहिती देशातील तळागाळापर्यंत पोहोचविणे तसेच नागरिकाकडून आलेल्या सूचना, मागणी, तक्रारी यांचा विचार करून उपलब्ध सार्वजनिक सेवा सुविधांचा दर्जा उंचावणे व ई – प्रशासनाचा वापर करून देशातील गरजू व्यक्तींना लाभ घेण्यासाठी प्रवृत्त केले जाते. देशातील नागरिकांना शासनाबरोबर केव्हा संवाद करावयाचा, कोठे संवाद करावयाचा व कशा प्रकारे संवाद करावयाचा याचे पर्याय उपलब्ध करून दिले जातात. उदा. इंटरनेट, फॅक्स, फोन, ई-मेल, की समोरा-समोर चर्चा इ. पर्याय उपलब्ध असतात.

3. शासन ते व्यवसाय

शासन ते व्यवसाय यांच्यातील संवादांचा मुख्य उद्देश म्हणजे परवाना, महसूल यामध्ये पारदर्शकता आणणे तसेच व्यापार गुंतवणूक व पर्यटन यांची जाहिरात करणे. व्यवसायिक समुदायाचे तक्रार निवारण करण्यासाठी ई – शासन हे साधन वापरले जाते यामध्ये व्यवसायिक समुदायाला सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या बरोबर सातत्याने संवाद साधला जातो. शासनाबरोबर संवाद साधताना लालफितीचा कारभार संपवणे, वेळेची बचत करणे, पारदर्शक व्यवसायिक वातावरण निर्माण करणे इ. काही ई – शासनाची उद्दिष्टे आहेत.

4. शासन ते कर्मचारी

लोकशाहीतील सर्वात मोठी संघटना म्हणजे कर्मचारी संघटना होय. यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटना, निम शासकीय कर्मचाऱ्यांच्या व खाजगी कर्मचाऱ्यांच्या संघटनेचा समावेश होतो. या प्रत्येक प्रकारच्या कर्मचाऱ्यांबरोबर सतत संवाद साधावा लागतो. ई – शासनाचा वापर केल्यामुळे हा संवाद जलदपणे व कार्यक्षमपणे घडतो.

**ई – शासनाची उपयुक्तता**

1. नागरिकांना मुबलक माहितीची व सेवेची उपलब्धता

शासनाचा प्रत्येक विभाग, आपल्या विभागाच्या संबंधित अर्ज, कायदे, नियम, प्रक्रिया, अहवाल, सार्वजनिक वादविवाद, निर्णय निश्चिती प्रक्रिया इ. सर्व बाबी नागरिकांच्यासाठी आपल्या वेबसाईटवर प्रकाशित करतात. ही माहिती नागरिकांना त्यांचा वेळ, पैसा, प्रयत्न, यांची बचत करून सहजासहजी उपलब्ध होते. थोडक्यात जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या सर्व सेवा - सुविधा नागरिकांना ई – शासनाच्या माध्यमातून उपलब्ध होतात.

2. शासकीय पातळीवर साधेपणा, कार्यक्षमता, जबाबदारी

ई – शासनामुळे पूर्वी असलेली शासकीय पातळीवरील जटिलता, ताठरता, संदिग्धता दूर होऊन सहजपणा, साधेपणा प्राप्त होतो. ई – शासनाद्वारे जटील प्रक्रियेचे सुलभिकरण केले जाते. नियम, कायदे यामध्ये लवचिकता आणली जाते. परिणामी शासनाच्या प्रक्रियेमध्ये सहजपणा येतो. तसेच शासन पातळीवर निर्णय प्रक्रियेची क्षमता व कार्यक्षमतेमध्ये वाढ होते. यामधून शासकीय यंत्रणा जास्तीत जास्त जबाबदार बनण्याचे पर्यावरण तयार होते. एकूणच शासनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये उत्पादकता व कार्यक्षमता वाढते.

3. शासनाचा विस्तार

शासनाने माहिती तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर केल्याने शासकीय यंत्रणा प्रत्येक नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविणे शक्य झाले आहे. टेलिफोनचा, मोबाईलचा विस्तार, इंटरनेटचा प्रसार, सुसंचनांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण यासारख्या अनेक सेवा शासनामार्फत पुरविल्याने शासन नागरिकापर्यंत पोहोचवण्याच्या प्रक्रियेचा विस्तार होतो. शासनाचा विस्तार झाल्यामुळे शासनाच्या प्रक्रियेमध्ये नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे.

**भारतीय प्रशासनातील ई – शासनाची निगडित काही निवडक विभाग**

1. ई – सेवा

या अंतर्गत ई – जल सेवा ई – विश्वकोश, ई -ऑफिस, ई कपास प्रकल्प, ई -चावडी, ई – नकाशा, ई – परवाना, ई – पूर्ण मोजणी, ई – रिक्रूमेंट, ई – लॉकर, ई – सेतू, ई – सेवा आरोग्य विषयक, ई – स्कॉलरशिप, इ. सेवा देण्यात येतात.

2. ऑनलाइन कायदेविषयक सेवा यामध्ये कायदेविषयक माहिती व सल्ला देण्यात येतो.

3. ऑनलाइन नागरी सेवा

अ. ॲक्शन सॉफ्ट

पंचायत राज्य संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी व देखरेख करणे.

ब. ॲसेट डिरेक्टरी

पंचायत राज्य संस्थांच्या मालकीच्या तसेच अधिपत्याखालील सर्व स्थावर व जंगम मालमत्तेचे अभिज्ञान व व्यवस्थापन.

क. आपले सरकार

तक्रार व्यवस्थापन प्रणाली- नागरी सेवा बद्दल नागरिकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी संबंधित संकेतस्थळ उपलब्ध आहेत.

4. माहिती अधिकार कायदा 2005

या कायद्याचीसुद्धा वेबसाईट तयार असल्यामुळे नागरिकांना विविध शासकीय विभागांची माहिती एका क्लिकवर मिळते.

5. डिजिटल इंडिया

या भागात केंद्र सरकार द्वारा डिजिटल भारत कार्यक्रमाविषयी माहिती दिली जाते. तसेच डिजिटल इंडिया कार्यक्रमाचे आधारस्तंभ, डिजिटल इंडिया उपक्रम, डिजिटल इंडिया कार्यक्रम व डिजिटल इंडियाची उद्दिष्ट क्षेत्र या सर्वांचा समावेश यामध्ये होतो.

6. डिजिटल पेमेंट

या विभागात विविध डिजिटल सिस्टीम बद्दल माहिती दिली आहे. उदा. गुगल पे, फोन पे, यूपीआय, भीम ॲप या घटकाचा समावेश होतो.

7. मोबाईल प्रशासन

या विभागात भारत सरकारच्या मोबाईल प्रशासन व त्या संबंधित इतर माहिती दिली आहे याद्वारे विविध दूरसंचार कंपन्यांचे नियंत्रण व त्यांच्याविषयी नागरिकांच्या असलेल्या तक्रारीचे निवारण केले जाते.

8. राज्यामधील ई – शासन

या विभागात भारतातील सर्व राज्यांमधील ई – शासनासंबंधीची माहिती देण्यात आली आहे.

9. राष्ट्रीय ई – शासन योजना

माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचे फायदे घेण्यासाठी नागरी सेवांचे शेवटच्या स्तरापर्यंत पारदर्शी, विना विलंब, आणि विना कटकट, मोफत वितरण सुनिश्चित करण्यासाठी देशात 1990 च्या शेवटी भारत सरकारने ही योजना लागू केली. त्यानंतर केंद्र सरकारने राष्ट्रीय ई – शासन योजना राबवण्याची मंजुरी दिली. भारतातील ई – शासनाला पाठिंबा मिळावा यासाठी 18 मे 2006 मध्ये 27 मिशन मोड परियोजना व 8 इतर घटकांचा यामध्ये समावेश करण्यात आला.

10. नोकरी रोजगार व्यवसाय आणि शिक्षण विषयक मार्गदर्शन

या विभागात पुढील उपविभागांचा समावेश होतो.

1. उद्योग व्यवसाय विषयक

या विभागात उद्योग आणि व्यवसाय विषयक मार्गदर्शक माहिती दिली आहे.

2. करियरनामा व शैक्षणिक माहिती मार्गदर्शन

या विभागात विविध करिअर व शैक्षणिक मार्गदर्शन तर माहिती दिली आहे.

3. नोकरी रोजगार विषयक माहिती

या विभागात नोकरी व रोजगार वार्तापत्र दिला आहे.

4. महास्वयंम पोर्टल

कौशल्य विकास विभागाच्या, महारोजगार M.S.S.D.S व महास्वयंम रोजगार या तिन्ही वेब पोर्टलचे एकत्रिकरण करून महास्वयंम हे वेब पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

**निष्कर्ष**

1.भारतीय प्रशासनात ई – शासनाच्या उपयुक्तता दिवसेंदिवस वाढ होताना दिसते.

2.ई – शासनाच्या माध्यमातून सर्वत्र प्रशासनात पेपरलेस व्यवहारावर जादा भर दिला जात आहे.

3.भारतीय प्रशासनातील लालफीतशाही, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता या वृत्तीला आळा बसून प्रशासनात पारदर्शकता निर्माण होताना दिसते.

4.नागरिक आणि प्रशासन यांचा संपर्क वाढल्यामुळे शासनाच्या योजना थेट लोकापर्यंत पोहोचत आहेत.

संदर्भसूची

1. इनामदार. ना. र. (1975), लोकप्रशासन, पुणे

2. प्रा. पाटील. व्ही. बी. (2018), भारतीय प्रशासन, के. सागर पब्लिकेशन्स पुणे.

3. डॉ. बोरा पारस, प्रा. शिरसाट शाम, लोकप्रशासन, नागपूर

4. काणे. प. सि, (1971) लोकप्रशासनाचे सिद्धांत, नागपूर

5. प्रा. पाटील. बी. बी. (2017), लोकशाही निवडणुका व सुशासन, फडके प्रकाशन कोल्हापूर.

6. प्रा. एच. बी. हेळंबे, जुलै (2011)), लोकप्रशासन नवीन विचार प्रवाह, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.